**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक २५ नोव्हेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

- **संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला आज पासून सुरवात, पहिल्याच दिवशी अदानी प्रकरणावरुन विरोधकांचा गदारोळ/ दोन्ही सदनांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब.**
- **रेल्वेच्या खाजगीकरणाचा प्रश्नच उद्भवत नाही- अखिल भारतीय अनुसूचित जाती आणि जमाती रेल्वे कर्मचारी संघटनेच्या कार्यक्रमात रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचं प्रतिपादन.**
- **उद्या ७५व्या संविधान दिनानिमित्त देशभर विविध कार्यक्रमांचं आयोजन.**
- **चार दिवसांत दोन लाख शेतकऱ्यांनी घेतला 'ॲग्रोव्हिजन' या मध्य भारतातील सर्वात मोठ्या कृषी प्रदर्शनाचा लाभ.**

**संसद अधिवेशन**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाचा आज पहिला दिवस होता. **लोकसभेत** सुरुवातीला दिवंगत खासदार, वसंतराव चव्हाण, शेख नुरूल इस्लाम आणि माजी खासदार, एम.एम.लॉरेन्स, एम.पार्वती आणि हरिश्चंद्र चव्हाण यांना आदरांजली वाहण्यात आली. त्यानंतर तहकूब झालेलं कामकाज, सुरू झाल्यानंतर विरोधी पक्षाच्या सदस्यांनी, अदानी समूहावरल्या, कथित लाचखोरी प्रकरण आणि उत्तर प्रदेशातल्या संभल इथल्या हिंसाचार प्रकरणावरून, सभागृह डोक्यावर घेतलं. त्यानंतर पीठासीन अधिकाऱ्यांनी, सभागृहाचं कामकाज, दिवसभरासाठी तहकूब केलं. **राज्यसभेतही** अदानी उद्योग समूहावर झालेल्या कथित लाचखोरी प्रकरणावरून विरोधकांनी, स्थगन प्रस्तावाची मागणी केली होती, ती, अध्यक्षांनी फेटाळून लावली. हा प्रस्ताव अध्यक्षांनी दिलेल्या, निर्देशानुसार नसल्याचं कारण, त्यांनी दिलं. भारतीय संविधानाला यंदा ७५ वर्षे पूर्ण होत असून, संसद सदस्यांनी लोकांसमोर, उच्च आदर्श प्रस्थापित करावेत अशी अपेक्षा, धनखड यांनी व्यक्त केली. तत्पूर्वी राज्यसभेचे दिवंगत सदस्य सीताराम येचुरी, गुरूचरण कौर, धरमपाल सबरवाल, ग्यानप्रकाश पिलानिया, धनेश्वर मांझी, प्रवतकुमार समंतराय यांना, आदरांजली वाहण्यात आली. संविधान दिना निमित्त उद्या, दोन्ही

सभागृहांची बैठक होणार नाही. अधिवेशनात, वक्फ दुरुस्ती विधेयकासह, सोळा महत्त्वाची विधेयकं, मांडण्याचं नियोजन आहे. वायूयान, आपत्ती व्यवस्थापन, रेल्वे, बंदरे आदी विधेयकांवरही, या अधिवेशनात, चर्चा होण्याची शक्यता आहे.

**मोदी- ओम बिर्ला**

दरम्यान, संसदेच्या हिवाळी अधिवेशनात, विधायक चर्चा होईल अशी आशा, पंतप्रधान **नरेंद्र मोदी** यांनी व्यक्त केली. अधिवेशन सुरू होण्याआधी ते, आज माध्यमांशी बोलत होते. संसदेतल्या वेळेचा उपयोग, देशाची प्रतिष्ठा जगात वाढवण्यासाठीच करायला हवी अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तर, संविधान सभेतल्या, वादविवादापासून प्रेरणा घेत, सभागृहाच्या सदस्यांनी, संसदेच्या शिष्टाचाराचं पालन करावं असं आवाहन, लोकसभेचे सभापती **ओम बिर्ला** यांनी, आकाशवाणीला दिलेल्या विशेष मुलाखतीत केलं. सभागृहाच्या सकारात्मक आणि रचनात्मक वादविवादाच्या परंपरेत सर्व खासदार भर घालतील अशी अपेक्षा व्यक्त करत, संसदेच्या शिष्टाचाराचे उच्च आदर्श खासदारांनी प्रस्थापित करावेत असं बिर्ला म्हणाले.

**अश्विनी वैष्णव**

संविधानाचा सन्मान हा संविधानाचं पुस्तक दाखवून होत नाही तर संविधाना पुढे नतमस्तक होऊन पंतप्रधान, नरेंद्र मोदी यांनी केला आहे. आज देखील या कार्यक्रमात आपण, संविधानाची शपथ घेऊन, संविधाना प्रति एकनिष्ठ आहो हे दाखवून दिल असं प्रतिपादन, केंद्रीय रेल्वेमंत्री, अश्विनी वैष्णव यांनी केलं. अखिल भारतीय अनुसूचित जाती आणि जमाती रेल्वे कर्मचारी संघटना यांच्या वतीनं, नागपूरच्या अजनी रेल्वे मैदानात, आज आणि उद्या, वार्षिक सर्वसाधारण सभा आणि राष्ट्रीय अधिवेशनाचं आयोजन करण्यात आलं असून, केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते, या कार्यक्रमाचं उद्घाटन संपन्न झालं. त्या वेळी ते बोलत होते. यावेळी रेल्वेत केलेल्या सुधारणांची त्यांनी माहिती दिली. रेल्वेच्या खाजगीकरणाबाबत ते म्हणाले

***मैंने रेल्वे के प्राव्हेटाज़ेशन के विषय में मैं और मेरे से पहले माननीय पियूष गोयल जी दोन्होने पार्लमेंट के फ्लोर पे कहा है, की रेलवे के प्राव्हेटाज़ेशन का***

***कोई प्रश्न नहीं उठता। रेलवे भारत की रीढ़ की हड्डी है, रेलवे भारत की लाइफ लाइन है, इसको हमें और मजबूत बनाना है। और इसीलिए प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदीजी ने रेलवे का बजट ३५- ४० हजार करोड़ होता था, आज उससे बढ़ाके ढाईलाख करोड़ रुपए बनाया है।***

२०१४ ते २०२४ या दहा वर्षाच्या काळात पाच लाख रेल्वे कर्मचाऱ्यांची भरती ही, पारदर्शक पद्धतीने झाल्याचं देखील वैष्णव म्हणाले. रेल्वे भरती करिता, वार्षिक कॅलेंडर सुद्धा, रेल्वेने पहिल्यांदाच तयार केलं असल्याचं, त्यांनी यावेळी सांगितलं.

**सत्ता स्थापनेच्या हालचाली**

राज्यात विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर, सत्ता स्थापनेच्या हालचालींना, वेग आला आहे. भाजप विधीमंडळ पक्षाची बैठक, आज होणार असून त्यात, पक्षाचा विधीमंडळ, पक्ष नेत्याची निवड करण्यात येईल. विधानसभा निवडणुकीत १३२ जागा जिंकत भाजपा सगळ्यात मोठा पक्ष ठरला आहे. १४व्या विधानसभेचा कार्यकाळ, उद्या समाप्त होणार आहे.

**आदित्य ठाकरे**

दरम्यान, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या विधिमंडळ गटनेतेपदी आमदार आदित्य ठाकरे यांची एकमतानं निवड करण्यात आली. विधानसभेच्या गटनेतेपदी आमदार, भास्कर जाधव यांची तर, प्रतोदपदी, आमदार सुनील प्रभू यांची निवड झाल्याची माहिती, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते, अंबादास दानवे यांनी आज पत्रकारांना दिली.

**यशवंतराव चव्हाण पुण्यतिथी**

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, राज्याचे पहिले मुख्यमंत्री, यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्य तिथीनिमित्त, आज कराड इथं, प्रितीसंगम या त्यांच्या समाधीस्थळी, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष, अजित पवार यांनी अभिवादन केलं. ज्यांच्या विचारधारा आणि आदर्शांवर, आम्ही लोकसेवेचा वारसा पुढे नेत आहोत त्या, चव्हाण साहेबांच्या दूरदृष्टीतील, समृद्ध महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी, लोकसेवेच्या

माध्यमातून, योगदान देण्याचा दृढ संकल्प आपण केला असल्याचं पवार यांनी, म्हटलं आहे.

**संविधान दिन**

उद्याच्या संविधान दिनानिमित्त आज, नवी दिल्लीत, हमारा संविधान हमारा स्वाभिमान पदयात्रा काढण्यात आली. डॉ.मनसुख मांडवीय, पीयुष गोयल, अर्जुन राम मेघवाल, किरेन रिजिजू, गजेंद्रसिंग शेखावत, रक्षा खडसे या केंद्रीय मंत्र्यांसह अनेक खासदार आणि ऑलिम्पिकमध्ये खेळलेले क्रीडापटू, सहभागी झाले होते. त्याखेरीज राष्ट्रीय छात्रसेनेचे, राष्ट्रीय सेवायोजनेचे विद्यार्थी आणि इतर स्वयंसेवी संघटनांचे सदस्या मोठ्या संख्येनं यात सहभागी झाले होते. उद्या ७५व्या संविधान दिनानिमित्त, विविध कार्यक्रमांचं आयोजन, केलं असल्याचं, संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितलं

***७५ वर्ष पूरा होने पर संविधान दिवस बहोत अच्छे तरह से मनाया जायेगा। संविधान सदन में दोनों सदन के सदस्य  के साथ देश के महामहिम आदरणीय राष्ट्रपति  द्रौपदी मुर्मूजी वहा एड्रेस करेंगी, और साथ साथ में कुछ महत्वपूर्ण डॉक्यूमेंट हम रिलीज करने वाले है।  संविधान से जुड़े हुए कई चीजे है, प्रकाशित होनेवाले है।  संविधान का किताब जो है, वो मामूली किताब नहीं है, उस किताब के अंदर में जो चित्र है, जो वर्णन किया गया है, और जो मूलभाव है उसको जनता तक ले जाने का प्रयास हम सबको करना है।***

'आमचं संविधान आमचा स्वाभिमान' असं, या वर्षभर चालणाऱ्या अभियानाचं घोषवाक्य असणार आहे. दरम्यान, डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मृती समिती, भारतीय खाण ब्युरोद्वारा, उद्या नागपूर इथं, I.B.M. मुख्यालयात, सकाळी अकरा वाजता ७५वा संविधान दिन साजरा होणार आहे. वर्ध्याचा महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात, संविधान जागृती राल्ली काढण्यात येणार असून, त्यानंतर व्याख्यानाचं देखील, आयोजन करण्यात आलं आहे. त्याचप्रमाण, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या, दीक्षांत सभागृहात देखील, संविधान दिनाच्या कार्यक्रमाचं, आयोजन करण्यात आलं आहे.

**हरिभाऊ बागडे**

भाजपचे ज्येष्ठ नेते, अरुण अडसड यांच्या, अमरावती स्थित निवासस्थानी आज, राजस्थानचे राज्यपाल, हरिभाऊ बागडे यांनी सदिछा भेट दिली. अरुण अडसड यांच्यावर काही दिवसापूर्वी शस्त्रक्रिया झाली होती. त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी बागडे यांनी हि भेट दिल्याचं आमच्या प्रतिनिधीनं कळवलं आहे.

**ऍग्रो व्हिजन समारोप**

मागील चार दिवसांपासून, पी.डी.के.व्ही.मैदान, दाभा इथं सुरू असलेल्या, मध्य भारतातील, सर्वात मोठे कृषी प्रदर्शन, 'ॲग्रोव्हिजन'चा आज समारोप झाला. समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी, ॲग्रोव्हिजनचे मुख्य प्रवर्तक, केंद्रीय मंत्री, नितीन गडकरी होते. तर, अरुणाचल प्रदेशचे कृषी, फलोत्पादन, पशुसंवर्धन, पशुवैद्यकीय, दुग्धविकास, मत्स्यपालन, अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री, गॅब्रिएल वांगसू यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते 'ॲग्रोस्पेक्ट्रम' या ॲग्री इंडस्ट्रीवर आधारित मासिकाचं प्रकाशन करण्यात आलं. ॲग्रोव्हिजनच्या आयोजनात सहभागी व्यक्तींचा तसंच प्रगतिशील शेतकरी पुरस्कार आणि निबंध स्पर्धांच्या विजेत्यांचा सत्कार करण्यात आला. ॲग्रोव्हिजन कृषी प्रदर्शनात, महाराष्ट्रासह मध्यप्रदेश, तेलंगणा अशा अनेक राज्यातील, शेतक-यांनी भेट दिली. दोन लाखापेक्षा अधिक शेतक-यांनी, भेट देत, नवनवीन तंत्रज्ञान, विविध कार्यशाळांच्या माध्यमातून, मिळालेल्या उपयोगी माहितीचा लाभ घेतल्याबद्दल, गडकरी यांनी आनंद व्यक्त केला.

**हवामान**

**हवामान** मागील २४ तासात, गोंदिया इथ सर्वात कमी बारा पूर्णांक पाच दशांश अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली आहे. तर नागपूर इथं किमान तापमान तेरा अंश सेल्सिअस इतकं नोंदविण्यात आलं. विदर्भातील सर्वाधिक कमाल तापमान अमरावती इथं ३१ अंश सेल्सिअस इतकं नोंदविण्यात आलं.

**एनसीसी दिवस**

भारतीय सैन्य दलाची दुसरी फळी म्हणजे राष्ट्रीय छात्रसेना अर्थात एनसीसी दिवस, काल अनेक महाविद्यालयांमध्ये उत्साहात साजरा करण्यात आला. एनसीसी स्थापना दिनानिमित्त, वर्धा जिल्ह्याच्या देवळी इथल्या S.S.N.J. महाविद्यालयात, कविता, प्रश्नमंजुषा, साहस आणि अडथळा पार प्रशिक्षणावर आधारित स्पर्धांचं, एनसीसी अधिकारी, कॅप्टन मोहन गुजरकर यांच्या मार्गदर्शनात, आयोजन करण्यात आलं होतं.

**पशु गणनेला सुरुवात**

पंचवार्षिक पशुगणनेस आज प्रारंभ झाला. २८ फेब्रुवारी पर्यंत ही मोहिम चालणार असून, त्यासाठी तीन हजार कुटुंबामागे एका प्रगणकाची नियुक्ती करण्यात आली आहे. पशुसंवर्धन विभागाकडून, दर पाच वर्षांनी अशी पशुगणना केली जाते. जनगणनेच्या धर्तीवरच, ही मोहिम राबविली जाते. मागील पशुगणना २०१९ मध्ये झाली होती. पशुगणनेमुळ, पशुसंवर्धन विभागाला, योजनांची अंमलबजावणी आणि निधीची उपलब्धता करणे, सोयीचं ठरणार आहे.

*****